# BDC LIBRARY
## New Paper Clipping
*A.Y. 2024-2025*

# पाटणमध्ये शनिवारी पुस्तकाचा प्रकाशन सोहळा

**पाटण**, दि. १९ : ज्येष्ठ पत्रकार व सेवानिवृत्त ग्रंथपाल प्रा. ए. व्ही. देशपांडे लिखित 'पत्रकारितेतील माझी ५० वर्ष या पुस्तकाचा प्रकाशन समारंभ शनिवार, दि. २२ रोजी सायंकाळी ४ वाजता बाळासाहेब देसाई महाविद्यालयातील बी. सी. ए. सभागृहात होत आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कोयना एज्युकेशन सोसायटीचे जनरल सेक्रेटरी अमरसिंह पाटणकर आहेत. प्रमुख वक्ते म्हणून ज्येष्ठ पत्रकार, ख्यातनाम वक्ते जडणघडण मासिकाचे मुख्य संपादक डॉ. सागर देशपांडे मार्गदर्शन करणार आहेत. यावेळी बाळासाहेब देसाई महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. डी. पवार, मराठी विभाग प्रमुख डॉ. पी. जे. अहिवळे, आयक्यूएसी प्रमुख प्रा. डॉ. सौ. हेमलता काटे यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. या सोहळ्यास प्राध्यापक, शिक्षक, पत्रकार यांनी उपस्थित रहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.